महत्त्वाचे

कला शिक्षक अमोल देवडे यांचे यश

औरंगाबाद : वेरुळ-अजिंठा

आंतरराष्ट्रीय महोत्सवांतर्गत घेण्यात आलेल्या शुभेच्छा पत्र बनविण्याच्या स्पर्धेत न्यू हायस्कूल शाळेचे कला शिक्षक अमोल देवडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी 'टाकाऊपासून टिकाऊ' अशी थीम देण्यात आली होती. केळीच्या साली, खराट्यांच्या काड्या यासारख्या वस्तूंपासून आकर्षक शुभेच्छा पत्रे बनविण्याऱ्या देवडे यांचे विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, राजेंद्र सुहिंदा, मंगला बोरकर आदींनी कौतुक केले.

सहसचिवपदी के.एम.आय.सय्यद

औरंगाबाद : दी इन्स्टिट्यूशन ऑफ

इंजिनिअर्सच्या सहसचिवपदी सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता के.एम.आय.सय्यद यांची संस्थेच्या एका बैठकीत निवड करण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा.डॉ.डी.जी.रेगुलवार यांची सदस्यपदी निवड झाली. उपाध्यक्षपदी सुभाष चांदुरे तर निमंत्रित म्हणून पी.बी.भांडेकर, विद्यापीठाच्या गौरी कल्लावार, तुकाराम इंद्राळे, गणेश साळुंके यांच्यासह अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील मुख्य अभियंत्यांचा समावेश आहे.

बाबा आढाव साधणार कष्टकऱ्यांशी संवाद

औरंगाबाद : सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव गुरुवारी १७ रोजी शहरात येत असून ते शेतकरी व कष्टकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. जाधववाडी येथील बाजार समिती संकुलात सकाळी ११ वाजता मेळाव्याला सुरुवात होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य हमाल-मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष सुभाष लोमटे उपस्थित राहणार आहेत. २ ऑक्टोबर रोजी डॉ. आढाव यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बेमुदत उपोषण सुरु केले होते. मुख्यमंत्र्यांनी सातव्या दिवशी बाबांना पत्र देऊन उपोषण सोडण्याची विनंती केली व १९ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्याचेही आश्वासन दिले पण हे दिलेले आश्वासन मुख्यमंत्र्यांनी पाळले नाही. यावरही मेळाव्यात चर्चा होऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असल्याची माहिती युनियनचे सरचिटणीस देवीदास कीर्तीशाही यांनी दिली.

'एनडीए'चा निकाल घोषित

औरंगाबाद : राष्ट्रीय लोकसेवा संघ आयोगाने घेतलेल्या लेखी परीक्षेत औरंगाबादेतील शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेचे तब्बल २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. १८ सप्टेंबर २०१६ रोजी राज्यात नागपूर व मुंबई येथे लेखी परीक्षा झाली होती. या परीक्षेला देशभरातून जवळपास ४ लाख २३ हजार ९७० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. पैकी ७ हजार ३७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राष्ट्रीय लोकसेवा संघ आयोग, पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये (खडकवासला) प्रवेश देण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. वर्षातून दोन वेळा अशी परीक्षा घेतली जाते. यामध्ये 'एसपीआय'च्या विद्यार्थ्यांनी राज्यात बाजी मारली आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी आर्मीसाठी ९, नेव्हीसाठी ३ आणि एअर फोर्ससाठी १३ जणांची निवड होणार आहे. या संस्थेतून आतापर्यंत ११२ विद्यार्थी पायलट झाले असून ४७० पेक्षा अधिक विद्यार्थी आर्मी व नेव्हीमध्ये अधिकारी पदांवर कार्यरत आहेत. उत्तीर्ण विद्यार्थी हे पुढील महिन्यात घेण्यात येणाऱ्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या मुलाखतीसाठी बोलावले जातील.

२० हजार संख्या : मागील वर्षाचेही पैसे मिळेनात

शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित

औरंगाबाद : एससी, ओबीसी, एनटी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीचे पैसे जिल्हा समाजकल्याण विभागाला अद्यापही मिळालेले नाहीत. यामुळे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील तब्बल २० हजार विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. चालू शैक्षणिक वर्षाचे अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सध्या सुरु असली तरी मागचेच मिळाले नाहीत, मग चालू वर्षाचे कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

आरक्षण असलेल्या घटकातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या माध्यमातून राज्य सरकार शिष्यवृत्ती देते. ही शिष्यवृत्ती लाभार्थी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष संपण्याच्या आधी देणे बंधनकाक असते. मात्र, राज्य सरकारच्या उदासीन धोरणामुळे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना पैसे देण्यासाठीचा निधीच समाजकल्याण विभागाकडे पाठविण्यात आलेला नाही.

हा निधी मिळाल्यानंतरच समाजकल्याण विभाग संबंधित लाभार्थ्यांना पैशाचे वितरण करतो. औरंगाबाद जिल्ह्यात २०१५-१६ मध्ये महाविद्यालयीन स्तरावर तब्बल ६९ हजार १८३ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले होते. यापैकी सात हजार ७९९ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. यासाठी १० कोटी ५० लाख रुपयांचा निधी आवश्यक आहे, तर ११ वी आणि १२ वीच्या वंचित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देण्यासाठी दोन कोटी रुपये लागणार आहे. मागील वर्षात तब्बल ५० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे, तर महाविद्यालय आणि उच्च माध्यामिक स्तरावरील २० हजार विद्यार्थी अद्यापही शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत.

या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी राज्य सरकारकडून साडेबारा कोटी रुपये निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. हा निधी आल्यावरच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येईल, असे औरंगाबाद समाजकल्याणचे सहायक आयुक्त जलील शेख यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.

साडेबारा कोटींची आवश्यकता

औरंगाबाद जिल्ह्यातील ५० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. उर्वरित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपासाठी साडेबारा कोटी रुपयांची आवश्यकता आहे. राज्य सरकारने हा निधी उपलब्ध करुन दिल्यास वितरित करण्यात येईल.

-**जलील शेख**, सहायक आयुक्त, समाजकल्याण औरंगाबाद

अन्यथा आंदोलन...

राज्य सरकार विद्यार्थ्यांना फसवत आहे. मागील वर्षाचीच शिष्यवृत्ती देण्यात आलेली नाही, तर चालू शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती कधी मिळणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने तातडीने शिष्यवृत्तीसाठी पैसा उपलब्ध करुन द्यावा, अन्यथा राज्यभरात तीव्र आंदोलन करण्यात येईल.

-**राहुल तायडे**, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

'अनुकंपा'चे २६२ उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत

पेच कायम : २००५ पासून सेवाज्येष्ठता यादी

औरंगाबाद : जिल्हा परिषदेत सेवेत कार्यरत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात येते. एकूण रिक्त जागांपैकी १० टक्के जागांवर अशा उमेदवारांची भरती केली जाते. मात्र, शासनाच्या नवनवीन परिपत्रकामुळे मयत कर्मचाऱ्यांच्या वारसाचे तब्बल २६२ प्रस्ताव सध्या जिल्हा परिषदेत पडून आहेत.

डिसेंबर २०१५ मध्ये जिल्हा परिषदेत कर्मचाऱ्यांची भरती झाली. तेव्हा एकूण रिक्त पदांच्या १० टक्के जागा अनुकंपा तत्त्वानुसार भरण्यात आल्या. सध्या सन २००५ ते २०१४ पर्यंत प्राप्त प्रस्तावांची सेवाज्येष्ठता यादी तयार आहे. यामध्ये प्रामुख्याने सामान्य प्रशासन विभागातील शिपाई, कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिकांच्या पदावर पात्रतेनुसार उमेदवार आहेत. गेली काही वर्षे अशा उमेदवारांना सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात शिपाई या पदावर नियुक्त केले जात होते. अलीकडे शासनाने शिपायाच्या भरतीवरच अंकुश लावला आहे. त्यामुळे अनुकंपा तत्त्वानुसार या पदावर सामावून घेण्याचा प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. वाढत्या महागाईमुळे मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरीसाठी जिल्हा परिषदेत हेलपाटे मारावे लागत आहेत.

अनुकंपा तत्त्वानुसार भरतीला प्राधान्य

जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजूषा कापसे यांनी सांगितले की, मागे जिल्हा परिषदेत भरती झाली तेव्हाही काही जागा भरण्यात आल्या. अलीकडे, शिपायाची पदेच कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अद्याप शासनाचा हा निर्णय आपल्या जिल्हा परिषदेत लागू झालेला नाही.

प्रमोद सरकटे स्वराज सरकटे

प्रमोद सरकटे, स्वराज सरकटे यांच्या स्वरांनी इंडोनेशियात रंगत

औरंगाबाद : इंडोनेशिया येथील बाली येथे स्वातंत्र्यवीर सावरकर विश्वसंमेलनामध्ये गायक व संगीतकार प्रमोद सरकटे, स्वराज सरकटे यांच्या श्रवणीय मराठी व हिंदी गीतांना रसिकांनी प्रतिसाद दिला.

९ ते १२ नोव्हेंबरदरम्यान हे विश्वसंमेलन झाले. प्रमोद आणि स्वराज यांच्या गीतांनी हॉलिडे इन कॉन्सर्ट हॉलचे वातावरण स्फूर्तीमय केले. मुंबईचे व्याख्यानकर्ते शंकर गायकर संमेलनाध्यक्ष होते.

मुंबई, विदर्भ, मराठवाडा या भागातील रसिक या संमेलनासाठी निमंत्रित होते. यावेळी प्रमोद सरकटे आणि मराठवाड्याचा युवा गायक स्वराज सरकटे यांचे श्रवणीय गायन व अनेक मान्यवरांचे व्याख्यान हे या संमेलनाचे खास आकर्षण ठरले.

सेतू केंद्रालाही नोटा बंदीचा फटका

औरंगाबाद : नोटाबंदीचा फटका जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रालाही बसला आहे.

प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी येणारे विद्यार्थी सामान्य नागरिक यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. एरव्ही सेतूमधील दलालांची लगबगही सध्या थांबलेली दिसत आहे.

अखेर शिक्षण राज्यमंत्री-कुलगुरुंची झाली भेट

१५ मुद्यांवर चर्चा : सरकारला अहवाल देणार, बैठक रुटिन असल्याचा चोपडे यांचा दावा

औरंगाबाद : विद्यापीठात झालेल्या विविध गैरव्यवहारांसंदर्भात नियोजित बैठक मंत्रालयातील उच्च शिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांच्या दालनात मंगळवारी पार पडली. या बैठकीमध्ये विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या १५ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. विविध आक्षेपांवर कार्यवाही केल्याचा अहवाल सादर करणे आणि उर्वरित आक्षेपांची सेवानिवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या, तसेच ही बैठक रुटिन असल्याचा दावा कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांनी 'लोकमत'शी बोलताना केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये पदभरती, निविदा प्रक्रिया, खरेदी आदींमध्ये मोठी गडबड झाल्याचा आक्षेप शिवसेना आ. संजय सिरसाट यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे घेतला होता.

या अनुषंगाने शिवसेना नेते व उच्चशिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांनी विद्यापीठामध्ये बैठक बोलावली होती. मात्र दोन वेळा कुलगुरु व राज्यमंत्र्यांची वेळ जुळली नसल्यामुळे बैठक होऊ शकली नाही.

शेवटी राज्यमंत्री रवींद्र वायकर यांनी १० नोव्हेंबर रोजी थेट विद्यापीठात दाखल झाले. याचवेळी कुलगुरु मंत्रालयात असल्यामुळे वायकरांना परत जावे लागले. शेवटी वायकर यांनी मंगळवारी सर्व कागदपत्रांसह मंत्रालयात उपस्थित राहण्याचे आदेश कुलगुरुंना दिले होते. यानुसार कुलगुरु डॉ. बी.ए. चोपडे, बीसीयूडी संचालक डॉ. सतीश पाटील, कुलसचिव डॉ. प्रदीप जब्दे, उपकुलसचिव दिलीप भरड, डॉ. प्रताप कलावंत, जी.डी. नागे यांनी बैठकीला कागदपत्रांसह उपस्थिती लावली, तर राज्यमंत्री अर्जुन खोतकर, आ. संजय सिरसाट, आ. अतुल सावे, आ. सतीश चव्हाण, आ. संदीपान भुमरे, आ. सुभाष साबणे, आ. जयप्रकाश मुंदडा यांच्यासह राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, औरंगाबादचे सहसंचालक डॉ. राजेंद्र धामणस्कर आदी उपस्थित होते.

उच्च शिक्षण संचालकांना केले लक्ष्य

राज्यमंत्री रवींद्र वायकर यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये विद्यापीठाचे तत्कालीन कुलसचिव व विद्यमान उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनाच लक्ष्य करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली, तर विनानिविदा सहा कोटींची सॉफ्टवेअर खरेदी, उत्तरपत्रिका खरेदी, विद्यमान बीसीयूडीच्या नियुक्तीमध्ये गोंधळ झाल्याचे कुलगुरुंनी मान्य केले असल्याचे समजते.

हे होते बैठकीचे विषय

तत्कालीन कुलसचिव डॉ. धनराज माने यांचे नियुक्ती वेळीचे वय, मार्च २०१२ ते मार्च २०१६ या कार्यकाळातील नोकरभरती, डॉ. के.व्ही. काळे यांची नेमणूक, डॉ. गुलाब खेडकर यांचे नेट-सेट प्रमाणपत्र, उपकुलसचिव डॉ. ईश्वर मंझा प्रकरण, विद्यमान बीसीयूडी संचालकांवर गुन्हे दाखल असल्याचे प्रकरण, पेटमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण दाखवणे, महाविद्यालयाच्या पदभरतीकरिता बोगस जाहिरात या १५ मुद्यांवर बैठक झाली.

सर्व प्रकरणांचा निपटारा

- मंत्रालयात झालेल्या बैठकीमध्ये विद्यापीठातील सर्वच प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये कारवाई केल्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्यमंत्र्यांनी कुलगुरुंना दिले.

-**संजय शिरसाट**, तक्रारदार आमदार

अहवाल राज्य सरकारला देऊ

- मंत्रालयामध्ये झालेली बैठक रुटिन होती. आक्षेप असलेल्या प्रकरणांवर विद्यापीठाने कारवाई केली आहे. त्याची माहिती देण्यात आली. तसेच ज्या प्रकरणात कारवाई करण्यात आलेली नाही, त्याची चौकशी निवृत्त न्यायाधीशांमार्फत करण्यात येईल. याविषयीचा अहवाल राज्य सरकारला देण्यात येईल.

-**डॉ. बी. ए. चोपडे**, कुलगुरु

हैं तय्यार हम...

मी धावणार आरोग्यासाठी

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

'लोकमत'तर्फे ११ डिसेंबर रोजी भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन धावपळीच्या युगात अनेकांचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. अत्याधुनिक यंत्रामुळे प्रत्येकाची लाईफ स्टाईल बदलली आहे. लहान मुलांपासून मोठ्या व्यक्तीपर्यंत प्रत्येकाला विविध आजारांचा सामना करावा लागतोय. स्वत:ला फीट ठेवण्यासाठी शहरातील नागरिकांना ही मॅरेथॉन स्पर्धा म्हणजे सुवर्णसंधीच असणार आहे. मी स्वत: या हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होणार आहे. शहरातील तरुण, तरुणींनी, महिलांनी, पुरुषांनी स्पर्धेत सहभागी व्हावे. आरोग्याच्या दृष्टीने ही स्पर्धा खूप उपयुक्त आहे.

- डॉ. रोहिणी काचोळे

औरंगाबाद कापड व्यापारी संघाचे पदाधिकारी व सदस्य ... डावीकडून सुभाष बाहेती, विनोद लोया, संदीप क्रृपलानी, शीतल संचेती, गौरव केलानी, गिरीश तोलवानी, राजू तोलवानी, किशोर काल्डा, भागचंद बिनायके, पंकेश अग्रवाल, राजेश काल्डा, दिलीप चोटलानी, अनुप अग्रवाल, सुशील माटरा

ग्राईंड मास्टर कंपनी...

उभे (डावीकडून) परमेश्वर सोनवणे, अजिंक्य कुलकर्णी, अभिजित कांबळे, समीर केळकर (सीईओ), अनिल खंडागळे, राजू बुधवंत, चंदन राजपूत, प्रशांत येवले, बसलेले (डावीकडून) विलास दाभाडे, नीलेश तलवारे, विजय खक्के, अविनाश शिंदे, कृष्णा विशिंग, समाधान सोळुंके, सचिन दुर्गीस्त.

आली एकदाची चना डाळ

औरंगाबाद : गेल्या दिवाळीच्या आधीपासून येणार येणार म्हणून गाजत असलेली चना डाळ आज दुपारी एकदाची औरंगाबादेत दाखल झाली. ७० रु. किलोप्रमाणे ही डाळ शहरातील १९७ रेशन दुकानांमधून विकली जाईल. आज सायंकाळपर्यंत अनेक रेशन दुकानांपर्यंत ही डाळ पोहोचली व कार्डधारकांना वाटप करायलाही सुरुवात झाली.

खरे तरी चढ्या भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी ७० रु. किलो या दराने ही डाळ दिवाळी सणापूर्वीच गोरगरिबांना व सर्वसामान्यांना वाटप केली जाणार होती; परंतु दिवाळी तर सोडा दिवाळी संपून गेल्यावरही ही डाळ यायला तयार नव्हती.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून पुन्हा ही डाळ येणार येणार म्हणून चर्चा सुरु झाली होती; पण आल्याशिवाय खरे नाही असे मानून रेशन दुकानदारांनी डाळीसाठी भरलेले सुमारे ३५ लाख रु. परत देण्याची मागणी पुढे केली होती. १५ नोव्हेंबरपर्यंत ही डाळ जर आली नाही तर आमचे पैसे परत करा, असा इशाराच रेशन दुकानदार महासंघाचे नेते डी. एन. पाटील यांनी दिला होता व यात अधिकाऱ्यांबरोबर रेशन दुकानदारांचीही बदनामी होत असल्याची तक्रार केली होती.

दरम्यान, आज दुपारी सुमारे २०० क्विंटल चना डाळ भरलेला ट्रक नागपूरहून औरंगाबादच्या उस्मानपुरा येथील गोदामात येऊन पोहोचला. आता दुसरा ट्रक एखाद दुसऱ्या दिवसात येणार असल्याची माहिती मिळाली.

ही डाळ खुल्या बाजाराप्रमाणे विकली जाणार आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. भारत कदम यांनी दिली; पण आम्ही ज्याला डाळ विकू त्याचा आधारकार्ड नं. मोबाईल नं. व सही घेऊ असे रेशन दुकानदारांतर्फे डी. एन. पाटील यांनी सांगितले. ऐन दिवाळी सणात चना डाळ येणार म्हणून सांगूनही ती न आल्याने राज्य शासनाच्या विश्वासार्हतेबद्दलच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते, आताही ग्रामीण भागासाठी चना डाळीचे वाटप नसल्याने ग्रामीण जनता नाराज होणार आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

दरम्यान दिवाळीनंतर येणाऱ्या चनाडाळीचा सर्वसामान्य नागरिकांना काहीच उपयोग नसल्याने ही चना डाळ विकली जाईल की नाही याबाबतही शंका उपस्थित होत आहेत. एखादी वस्तू नागरिकांना पुरविण्याचा निर्णय झाल्यानंतर ती जनतेपर्यंत पोहोचण्यात खूपच अवधी गेला असल्याने सरकारच्या काम करण्याच्या गतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून जाहीरपणे आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून खाजगीत व्यक्त होत आहेत.

आता भाव नियंत्रणात येतील...

- आता ही डाळ फक्त औरंगाबाद शहरातच विकली जाणार आहे. नोटाबंदीच्या पार्श्वभूमीवर या डाळीची खरी गरज ग्रामीण भागात आहे; पण पुरवठा खात्याने अद्याप ग्रामीण भागाचा विचार केलेला दिसत नाही. तो करावा आणि मागणी ग्रामीण भागातील रेशन दुकानदारांकडूनही होत आहे. सध्या खुल्या बाजारात चना व तूर डाळीचे भाव नियंत्रणात नाहीत. रेशन दुकानांतून चना डाळ उपलब्ध करुन दिल्याने भाव नियंत्रणात येतील, असे मानले जात आहे.

बाल दिनानिमित्त फॅन्सी ड्रेस व डान्स स्पर्धेला प्रतिसाद

औरंगाबाद : बाल दिनानिमित्त प्रोझोन मॉल येथे कॅम्पस क्लब, क्रिएटिव्ह ग्रुपतर्फे आयोजित फॅन्सी ड्रेस व डान्स स्पर्धा विविध वयोगटात घेण्यात आल्या. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

फॅन्सी ड्रेस स्पर्धेसाठी रचना सोनी, अमित जैन व राजेश चंचलानी यांनी परीक्षण करुन निकाल जाहीर केले. डान्स स्पर्धेसाठी रेमो डिसुजा यांचे शिष्य रौनिक भातेजा व डान्स प्लस सिजन -१ मधील राहुल बर्मन यांनी परीक्षण केले. जेनिफर रॉड्रिक्स व रवी मिश्रा यांनी सूत्रसंचालन केले.

स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे -

फॅन्सी ड्रेस - गट - अ - २ ते ५ वर्षे

प्रथम-आद्या देशमुख, द्वितीय-आर्या शेलार, तृतीय-यज्ञा शेलगावकर, चतुर्थ-अथर्व शेटे, पाचवा-श्रीरंग रहाळकर

फॅन्सी ड्रेस - गट - ब- ५ ते ८ वर्षे

प्रथम-स्वानंद सुदामे, द्वितीय-ध्रुव धानुका, तृतीय-चरिस्टोफर पाठरोस, चतुर्थ-तन्मन बिऱ्हारे, पाचवा- प्रियम मिसाळ

फॅन्सी ड्रेस स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धकांसमवेत क्रिएटिव्ह ग्रुपचे संचालक रवी जैस्वाल व परीक्षक.

फॅन्सी ड्रेस - गट - क - ८ ते १२ वर्षे

प्रथम-वैष्णवी नरवडे, द्वितीय-हर्षल गुनवाणी व कृष्णा बंग विभागून बक्षीस तृतीय-विधी सोळंके, चतुर्थ-आदित्य बिऱ्हारे

सोलो डान्स - गट - अ -

प्रथम -ध्रुव धानुका, द्वितीय - रश्मी गायकवाड, तृतीय - अनन्या जाचक

सोलो डान्स - गट - ब -

प्रथम -वैष्णवी नरवडे, द्वितीय - ऋतुजा गंगावणे, तृतीय - गार्गी कोठावडे

सोलो डान्स - गट - क - प्रथम - ऋतुजा पवार, द्वितीय -निशिगंधा सक्सेना, तृतीय - वैष्णवी कुलकर्णी

ड्युएट डान्स - प्रथम -दिया व हर्षिता, द्वितीय -रोहित व सानिका, तृतीय - श्रेया व क्षितिजा.

ग्रुप डान्स - प्रथम - युनिक डान्स ग्रुप - कटपुतली डान्स

या स्पर्धेनंतर सर्व सहभागी स्पर्धकांना आयोजकांतर्फे सहभाग प्रमाणपत्र, किडस् लॅण्डतर्फे गिफ्ट व्हाऊचर्स व विजेत्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी क्रिएटिव्ह ग्रुपचे संचालक रवी जैस्वाल तसेच प्रोझोन मॉलचे अर्शद, तिरुपती डेंटलचे डॉ. बलबीर आनंद, स्मार्ट मणीचे केतन, किडस् लॅण्डचे मिलिंद पोटे, पुष्कर भातांब्रेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी क्रिएटिव्ह ग्रुपचे रोहित दाणे, काशिफ, इंद्रजित फासगे, प्रशांत जगधने, गौरव कुलकर्णी, गीतेश खंदारे, शेख मुजम्मिल, रुपाली, निशा सैनानी व अनुष्का जयंत यांनी परिश्रम घेतले.

Diwali Vacations are over.
But the Fun and Joy can continue.
So let's continue to Have Fun and Learn at The Yellow Door.

We're waiting to Welcome You Back.
• Gymnastics • Mini Tennis
• Chess • Football • Karate • Skating
• Mother Toddler • Mathematics
• Speech and Drama • Arts
Age: 0.7 yrs. to 14 yrs.
The Yellow door
For Details Call : 9850372800, 9527752800
Lokmat Bhavan, Jalna Road, Aurangabad
Note: Entry from rear gate The yellow door aurangabad